राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत पिक विमा निधी दाव्यापोटी देण्यात येणारी नुकसान भरपाईची रु.९३,९३,८७,९८२/- रक्कम अदा करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुरक -२०१५/प्र.क्र.२५७/११ अे,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: १३ जानेवारी, २०१६.

वाचा -

१) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.संकीर्ण२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्रशा.५, दि.२४.७.२०१५
३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.सां.८/पिवियो/३३५/२०१५, दि.८.१०.२०१५
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.पुरक२०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प-३, दि.१.१.२०१६
५) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.पुरक डिसें-२०१५/(प्र.क्र.१३५/१५)/२-अे, दि.४.१.२०१६

प्रस्तावना -

राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत "मागणी क्रमांक डी-३, २४०१-पीक संवर्धन, ११०-पिक विमा, (००) (०४) पिक विमा निधी दाव्यापोटी देण्यात येणारी नुकसान भरपाई (२४०१ ३४११) योजनेतर" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून रु.९३,९३,८७,९८२/- एवढी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत कृषि आयुक्तालयाने कळविले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	बाब	रक्कम रु.
१	राष्ट्रीय कृषि विमा योजना सन २०१३-१४ मधील प्रशासकीय खर्च	२३,३९,७३४/-
२	राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी २०१४-१५मधील प्रचार व प्रसिध्दी	१,१८,१८०/-
३	राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ मधील नुकसान भरपाई	२३,१८२/-
४	राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ मधील बँक सेवा शुल्क	१,४१,३०,२३४/-
५	राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मधील प्रशाकीय खर्च	४८,४४,३९०/-
६	राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत उस पिकासाठी २०१२,२०१३ व २०१४ मधील बँक सेवा शुल्क	९४,३४७/-
७	राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी २०१४-२०१५ मधील बँक सेवा शुल्क	२५,०५,९३९/-
८	राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०१४-२०१५ नुकसान भरपाई	९१,१२,७८,२३०/-
९	राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप हंगाम २०१५ प्रचार व प्रसिध्दी	७,४१,७००/-
१०	राष्ट्रीय कृषि विमा योजना अंतर्गत शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांचेमार्फत प्राप्त पीक कापणी प्रयोग तक्ते छपाई देयक	३३,१२,०४६/-
	एकुण	**९३,९३,८७,९८२/-**

सदरची रु.९३,९३,८७,९८२/- (रुपये त्र्यान्नव कोटी त्र्यान्नव लक्ष सत्त्याऐंशी हजार नउशे ब्याऐंशी फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत (२४०१ ३४११) रब्बी हंगाम २०१५-१६ तसेच उपरोक्त नमूद इतर बाबींसाठी राज्य शासनाच्या हिश्श्याची रु.९३,९३,८७,९८२/- (रुपये त्र्यान्नव कोटी त्र्यान्नव लक्ष सत्त्याऐंशी हजार नउशे ब्याऐंशी फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास या शासन निर्णयान्वये शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर खर्च खालील लेखाशीर्षाखाली सन २०१५-१६ करिता मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा :

"मागणी क्रमांक डी - ३, २४०१- पीक संवर्धन,

११०-पीक विमा,

(००) (०४) **पिक विमा निधी दाव्यापोटी देण्यात येणारी नुकसान भरपाई**

(२४०१ ३४११), ३२- अंशदान (योजनेतर)"

३. सदरचा निधी रु.९३,९३,८७,९८२/- (रुपये त्र्यान्नव कोटी त्र्यान्नव लक्ष सत्त्याऐंशी हजार नउशे ब्याऐंशी फक्त) वितरीत करणेबाबत वित्त विभागाच्या उपरोक्त अनुक्रमांक १ येथील परिपत्रकामधील परिच्छेद ७ ते १८ मधील सर्व अटींची पूर्तता करण्यात आली आहे. तसेच या परिपत्रकातील तपासणी सूचीतील सर्व अटींची देखील पूर्तता करण्यात आली आहे त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या उपरोक्त अनुक्रमांक २ येथील परिपत्रकातील "अ" मधील प्रशासकीय विभागांनी निधी वितरीत करताना घ्यावयाची दक्षता याबाबत मुद्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	बाब	स्पष्टीकरण
१	विभागास प्रदान वित्तीय अधिकार	शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५ व शासन परिपत्रक वित्तविभाग क्र.पुरक२०१५/ प्र.क्र.२०१/ अर्थसंकल्प-३, दि.१.१.२०१६ अन्वये प्रदान करण्यात आलेले आहे.
२	मंजूर निधी	रु.७८४,६७,८७,९८२/-
३	मागील ३ महिन्यापूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५ टक्के किंवा अधिक निधी खर्च झाला आहे.	होय.
४	ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षाअंतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.	प्रलंबित नाही.
५	स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देताना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यात आली आहे.	लागू नाही.

६	वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करताना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे.	लागू नाही.
७	बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देताना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा.	लागू नाही.
८	अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रितसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत.	लागू नाही.
९	खरेदी विषयक प्रक्रिया अद्ययावत संबंधित शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा.	लागू नाही.
१०	साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरित करावी.	लागू नाही.

४. या प्रयोजनासाठी सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" तर कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८/२०१६/व्यय-१ दि.१३.१.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११३१५०८१९०७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Balkrishna Pawaskar

Digitally signed by Sharad Balkrishna Pawaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sharad Balkrishna Pawaskar
Date: 2016.01.13 15:10:26 +05'30'

श.बा.पावसकर
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
५) सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

७) महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
८) वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई ३२
९) कक्ष अधिकारी (२ अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१०) अतिरिक्त मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
११) उप सचिव (११-अे/२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१२) निवड नस्ती (कार्यासन ११अे)